महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.
M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.



क्र. मुंविमं/कैनि/जून-जुलै २०२६/2७४३
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.
दिनांक :-१३/०६/२०२६

प्रति,

सर्व मान्यता प्राप्त शाळा व क. म. विद्यालय
मुंबई विभागीय मंडळ, नवी मुंबई, वाशी.

**विषय :-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा जून-जुलै २०२६ शिक्षासूची वाचनाबाबत.

**संदर्भ :-** क्रमांक रा.मं/परीक्षा-८/२४७९ दिनांक:- १२/०६/२०२६ चे पत्र

उपरोक्त संदर्भीय विषया नुसार कळविण्यात येते की, जून-जुलै २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षे करिता प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यान कडून संदर्भीय पत्रानुसार शिक्षासूचे वाचन आपल्या स्तरावरून करून घेण्यात यावे, तसेच एकही विद्यार्थी शिक्षासूची वाचनापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

**सोबत :- संदर्भीय पत्र जोडण्यात आलेले आहे.**

**(ज्योत्स्ना शिंदे-पवार)**
**विभागीय सचिव,**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई - ४०० ७०३**

**प्रत माहितीस्तव :-**

१. मा. सचिव, रा. म. पुणे
२. मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग
३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) - ठाणे, रायगड व पालघर
४. शिक्षण निरीक्षक - पश्चिम, उत्तर व दक्षिण मुंबई विभाग

Email - sschsc.mumbaiboard@gmail.com Manyata207@gmail.com Website-www.sscboardmumbai.in
Telephone: 27652445, 27662504, 27881075, 27881077, 27899987 Fax:27659491/27881349

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education,S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

क्रमांक रा.मं/परीक्षा–८/२४७९
दिनांक- १२/०६/२०२६

**प्रति,**

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय :–**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा जून–जुलै २०२६ शिक्षासूची वाचनाबाबत.

उपरोक्त विषयाचे संदर्भात सूचित करण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षांचे आयोजन जून–जुलै २०२६ मध्ये करण्यात आलेले आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे आणि परीक्षेशी संबधीत घटकांच्या वैचारिक मनोवृत्तीमुळे परीक्षेत विविध मार्गानी निष्पन्न होणाऱ्या गैरप्रकारांचा मंडळाला सातत्याने सामना करावा लागतो. त्यादृष्टीने राज्यातील नऊ विभागीय मंडळे आपआपल्या स्तरावर विविध उपाययोजना आणि उपक्रम राबवित असतात. याच धर्तीवर विद्यार्थ्यांनी परीक्षेमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार करू नये, यासाठी गैरप्रकारामुळे विद्यार्थ्यांना मंडळाच्या शिक्षासूचीनुसार होणारी कार्यवाही अवगत करणे आवश्यक आहे.

यासाठी विद्यार्थ्यांसाठी असणारी शिक्षासूची तसेच उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावर मागील बाजूस पृ.क्र.२ वर असणाऱ्या सूचना यांचे सामूहिक वाचन शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या समोर परीक्षेपूर्वी /प्रात्यक्षिक परीक्षा कालावधीत करणे आवश्यक आहे, शक्य असल्यास प्रत्येक विद्यार्थ्यास त्याची प्रत देण्यात यावी. सदर कार्यवाही केल्याबाबत विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेवून सदरचा दस्तऐवज शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे स्तरावर दप्तरी ठेवण्यात यावा. तसेच याबाबतचे प्रमाणपत्र शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाच्या ई–मेलवर पाठवावे. असे आपल्या स्तरावरून विभागीय मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करावे.

विद्यार्थ्यांसाठी शिक्षासूची, उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठाच्या मागील बाजूच्या सूचना व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर करावयाचे प्रमाणपत्राचा नमुना, इत्यादी राज्यमंडळाच्या संकेतस्थळावरून प्रसिध्द करण्यात येईल ते शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांचा लॉगीन आयडी वापरून डाऊनलोड करून घ्यावयाच्या आहेत. तेव्हा उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणेबाबत आपल्या स्तरावरून सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना तात्काळ कळविण्यात यावे. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्यमंडळ कार्यालयास सादर करावा.

Digitally signed by
DIPAK AMBADAS MALI
Date: 12-06-2026
19:16:00

(दि.अ.माळी)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळामार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षांशी संबंधित अधिकारी/कर्मचारी व परीक्षार्थी इत्यादींच्या संदर्भातील प्रस्तावित शिक्षासूची –

**परिशिष्ट भाग–२ (ब–१)**

**परीक्षार्थी**

| अ.क्र. | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (A) परीक्षापूर्व | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (B) परीक्षाकाळात | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (C) परीक्षोत्तर | शास्तीचा तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | कोणत्याही परीक्षार्थ्याने मंडळाच्या कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेल्या ऑनलाईन/ ऑफलाईन अर्जामध्ये खोटी माहिती सादर करणे. | ---------- | ---------- | १) डिबार विद्यार्थ्याचे बाबतीत त्याच्या प्रतिबंधित कालावधीपर्यंत प्रतिबंध करणे. २) परीक्षेनंतर निदर्शनास आल्यास त्या परीक्षेची संपादणूक रद्द करणे. |
| २ | परीक्षार्थ्याने खोटी प्रमाणपत्रे/ गुणपत्रिका/कागदपत्रे देऊन इ.९ वी/इ. १० वी अगर इ. ११ वी/ इ. १२ वी मध्ये प्रवेश घेऊन त्या आधारे इ. १० वी/इ. १२ वी परीक्षेस आवेदनपत्र सादर करणे. | ---------- | ---------- | १) परीक्षेपूर्वी निदर्शनास आल्यास परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करणे. २) परीक्षेनंतर निदर्शनास आल्यास संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे |
| ३ | परीक्षार्थ्याने परीक्षेपूर्वी अगर ऐन वेळी खोटे/प्रतिज्ञापत्र/हमीपत्र/ अपघाताचा/ अपंगत्वाचा वैद्यकीय दाखला केंद्रसंचालकाकडे सादर करून सवलत घेणे व विषय/केंद्र बदलून परीक्षेस प्रविष्ट होणे. | ---------- | ---------- | १) परीक्षेपूर्वी निदर्शनास आल्यास परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करणे. २) परीक्षेनंतर निदर्शनास आल्यास संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे. ३) संबंधित परीक्षार्थ्याविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल करणे. |

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (A) परीक्षापूर्व | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (B) परीक्षाकाळात | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (C) परीक्षोत्तर | शास्तीचा तपशील |
|---|---|---|---|---|
| ४ | मंडळाकडून परीक्षेला प्रविष्ट होण्यासाठी देण्यात आलेल्या प्रवेशपत्रावर/द्वितीय प्रतीवर अनधिकृतपणे बदल करणे/बनावट प्रवेशपत्र तयार करणे व त्याआधारे परीक्षेस प्रविष्ट होणे. | ---------- | ---------- | १) परीक्षेपूर्वी निदर्शनास आल्यास परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करणे.<br>२) परीक्षेनंतर निदर्शनास आल्यास संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे.<br>३) संबंधित परीक्षार्थ्याविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल करणे. |
| ५ | मंडळाकडून परीक्षेला प्रविष्ट होण्यासाठी देण्यात आलेल्या प्रवेशपत्रावर/द्वितीय प्रतीवर अनधिकृतपणे बदल करणे व त्या आधारे स्वतःऐवजी अन्य व्यक्तीने (तोतया) परीक्षेस प्रविष्ट होणे, निकाल जाहीर झाल्यानंतर तोतयेगिरी अगर गैरमार्ग प्रकरणे उघडकीस येणे. | ---------- | ---------- | १) संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे व पुढील पाच परीक्षांना प्रतिबंध करणे.<br>२) मूळ परीक्षार्थी व तोतया विद्यार्थ्याविरुद्ध केंद्रसंचालकाने / विभागीय मंडळाने प्रकरणपरत्वे फौजदारी गुन्हा दाखल करणे. |
| ६ | मंडळाच्या अधिकृत उत्तरपत्रिका, पुरवण्या, आलेख, नकाशे, लॉग टेबल, अनधिकृतपणे मिळवणे/आणि वापर करणे. | मंडळाच्या अधिकृत उत्तरपत्रिका, पुरवण्या, आलेख, नकाशे, लॉग टेबल, अनधिकृतपणे मिळवणे/आणि वापर करणे. | ---------- | परीक्षार्थ्याची संबंधित विषयांची संपादणूक रद्द करणे व पुढील एका परीक्षेस प्रतिबंध करणे. |
| ७ | मंडळ परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांची चोरी करणे, मिळविणे, विकणे व विकत घेणे तसेच भ्रमणध्वनी व अन्य इलेक्ट्रॉनिक्स माध्यमावर प्रसारित करणे व मिळविणे. | मंडळ परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांची चोरी करणे, मिळविणे, विकणे व विकत घेणे तसेच भ्रमणध्वनी व अन्य इलेक्ट्रॉनिक्स माध्यमावर प्रसारित करणे व मिळविणे. | ---------- | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे.<br>२) पुढील पाच परीक्षांना प्रतिबंध करणे<br>३) परीक्षार्थ्याविरुद्ध प्रकरणपरत्वे फौजदारी/सायबर लॉ ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करणे. |
| ८ | ---------- | मंडळाने मान्यता न दिलेली अथवा प्रतिबंध केलेली साधने/साहित्य परीक्षा दालनात स्वत:जवळ बाळगणे/वापरणे. | ---------- | परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रद्द करणे. |

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (A) परीक्षापूर्व | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (B) परीक्षाकाळात | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (C) परीक्षोत्तर | शास्तीचा तपशील |
|---|---|---|---|---|
| ९ | ---------- | परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरू असताना विषयाशी संबंधित अथवा अन्य कोणतेही हस्तलिखित, कागद, वह्या, टिपण्या, मार्गदर्शिका, पुस्तकातील पाने, पुस्तक, नकाशे, इ. जवळ बाळगणे/ कपड्यावर/रायटींग पॅडवर/हातावर किंवा शरीराच्या भागावर लिहून ठेवणे. परीक्षार्थ्याच्या टेबल, खुर्ची, ड्युएल डेस्कमध्ये विषयाशी संबंधित असलेले कॉपी साहित्य आढळणे. | ---------- | परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रद्द |
| १० | ---------- | परीक्षा केंद्रात/परीक्षादालनात कोणत्याही प्रकारचे हत्यार/शस्त्र घेऊन येणे किंवा स्वत:जवळ बाळगणे, धमकावणे व दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणे. | ---------- | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द व त्याच्याविरुध्द पोलीसांत फौजदारी गुन्हा दाखल करणे. २) पुढील पाच वर्ष परीक्षेस प्रतिबंध करणे. |
| ११ | ---------- | उत्तरपत्रिका, पुरवणी/नकाशा व आलेखासोबतच्या पुरवणीचा काही भाग निळ्या किंवा काळ्या शाईव्यतिरिक्त अन्य शाईंत (उदा. लाल,हिरवी, इ.) लिहिणे, काळा/निळा बोरू पेन तथा शीर्षकासाठी रंगीत शाई/स्केच पेन व आकृत्यांसाठी हिरवी/लाल शाई किंवा रंगीत पेन्सिलचा वापर करणे / व्हायटनरचा वापर करणे. | ---------- | संदर्भीत भागास गुणदान न करणे. |
| १२ | ---------- | उत्तरपत्रिकेत/पुरवणीत प्रक्षोभक/ अर्वाच्य भाषेचा वापर, शिवीगाळ लिहिणे किंवा धमक्या देणे, बैठक क्रमांक/फोन नंबर/भ्रमणध्वनी क्रमांक देऊन संपर्क साधण्यास सुचविणे/विनंती करणे. विषयाशी संबधित नसलेला अन्य मजकूर लिहिणे (चुकीची उत्तरे वगळून). | ---------- | चौकशी करुन परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रदद करणे. |



Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (A) परीक्षापूर्व | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (B) परीक्षाकाळात | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (C) परीक्षोत्तर | शास्तीचा तपशील |
|---|---|---|---|---|
| १३ | ---------- | लेखी विनंती, उत्तरपत्रिकेला चलनी नोटा जोडणे/आर्थिक आमिष दाखवणे. | ---------- | १) उत्तरपत्रिकेस जोडलेली संपूर्ण चलनी रक्कम विभागीय मंडळाने जप्त करणे. २) परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रद्द करणे . |
| १४ | ---------- | परीक्षादालनात अन्य परीक्षार्थ्याची उत्तरपत्रिका/पुरवणी/बारकोड जबरदस्तीने/बळजबरीने ताब्यात घेणे, खराब करणे, फाडणे, खोडणे, इ. | ---------- | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द. २) पोलीसात गुन्हा दाखल करणे. |
| १५ | ---------- | परीक्षादालनात कॉपी करण्यास मदत करण्यासाठी अन्य परीक्षार्थ्यांना धमकावणे किंवा बळजबरी करणे. | ---------- | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे. २) पोलीसात गुन्हा दाखल करणे. |
| १६ | ---------- | पर्यवेक्षक, केंद्रसंचालक, परीक्षेशी संबंधित अधिकारी/कर्मचारी तसेच परीक्षक, नियामक, मुख्य नियामक, परिरक्षक यांना स्वत: किंवा अन्य व्यक्तीद्वारे धमकी देणे किंवा दबाव आणणे किंवा मारहाण करणे. परीक्षा यंत्रणेतील घटकांना लाच देण्याचा प्रयत्न करणे. | पर्यवेक्षक, केंद्रसंचालक, परिरक्षक , परीक्षेशी संबंधित अधिकारी/कर्मचारी तसेच परीक्षक, नियामक, मुख्य नियामक यांना स्वत: किंवा अन्य व्यक्तीद्वारे धमकी देणे किंवा दबाव आणणे किंवा मारहाण करणे. परीक्षा यंत्रणेतील घटकांना लाच देण्याचा प्रयत्न करणे.. | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे. २) संबंधित बाधित व्यक्तीने/केंद्रसंचालक यांनी परीक्षार्थ्याविरुद्ध पोलीसांत फौजदारी गुन्हा दाखल करणे. |
| १७ | ---------- | परीक्षादालनात पकडण्यात आलेले गैरमार्गाचे प्रकरण मंडळाकडे न पाठविण्यासाठी स्वत: अगर इतर व्यक्तीमार्फत केंद्रसंचालक/ उपकेंद्रसंचालक/पर्यवेक्षक यांच्यावर दबाव आणणे. | ---------- | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द. २) केंद्रसंचालक यांनी परीक्षार्थ्याविरुद्ध पोलीसात फौजदारी गुन्हा दाखल करणे. |
| १८ | ---------- | परीक्षा सुरू असताना इतर परीक्षार्थ्यांबरोबर उत्तराच्या संदर्भात गैरहेतूने संपर्क साधणे/एकमेकांचे पाहून लिहिणे, अन्य परीक्षार्थ्यांस तोंडी उत्तरे सांगणे. | ---------- | परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रद्द करणे. |



Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (A) परीक्षापूर्व | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (B) परीक्षाकाळात | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (C) परीक्षोत्तर | शास्तीचा तपशील |
|---|---|---|---|---|
| १९ | ---------- | परीक्षादालनात जाणूनबुजून दोन किंवा दोनपेक्षा अधिक परीक्षार्थ्यांनी एकत्रितरीत्या नक्कल करणे किंवा गैरमार्गाचा अवलंब करणे/सामुदायिक कॉपी करणे. | ---------- | परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे. |
| २० | ---------- | परीक्षादालनात परीक्षा सुरू असताना प्रश्नपत्रिकेवर उत्तरे लिहिणे/लिहून दुसऱ्या परीक्षार्थ्याकडे देणे/प्रश्नपत्रिकेवर उत्तरासाठी खुणा करणे. | ---------- | परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रद्द करणे. |
| २१ | ---------- | स्वत:ची/दुसऱ्या परीक्षार्थ्याची उत्तरपत्रिका किंवा पुरवणी उत्तरपत्रिकेची पृष्ठे, पुरवणी उत्तरपत्रिका, बारकोड, हॉलोक्राफ्ट, नकाशा, आलेख पुरवणी नष्ट करणे/नष्ट करण्याचा प्रयत्न करणे, स्वत:बरोबर दालनाबाहेर घेऊन जाणे | ---------- | १) प्रकरणपरत्वे परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची / संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे.<br>२) पोलीसांत गुन्हा दाखल करणे. |
| २२ | ---------- | परीक्षार्थ्याकडे आढळून आलेले कॉपी साहित्य परीक्षार्थ्याने नष्ट करण्याचा प्रयत्न करणे. (उदा.- खिडकीतून बाहेर फेकणे/फाडून टाकणे/खाणे इ.) | ---------- | परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रद्द करणे . |
| २३ | ---------- | परीक्षार्थ्याने लिहिलेल्या उत्तरपत्रिका परिरक्षक कार्यालयात जमा झाल्यानंतर परीक्षार्थ्याने स्वतः किंवा अन्य व्यक्तीमार्फत बाहेर नेणे व पुन:श्च परिरक्षक कार्यालयात जमा करणे. | परीक्षार्थ्यांनी लिहिलेल्या उत्तरपत्रिका परिरक्षक कार्यालयात जमा झाल्यानंतर परीक्षार्थ्याने स्वतः किंवा अन्य व्यक्तीमार्फत बाहेर नेणे व पुन:श्च परिरक्षक कार्यालयात जमा करणे. | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द<br>२) पोलीसांत गुन्हा दाखल करणे. |
| २४ | ---------- | स्वत:ची किंवा इतर परीक्षार्थ्याची लिहिलेली उत्तरपत्रिका आणि/किंवा पुरवणी उत्तरपत्रिका अनधिकृतपणे घेऊन येणे/जाणे तसेच परीक्षा केंद्रात अन्य ठिकाणी/परीक्षा केंद्राव्यतिरिक्त अन्य ठिकाणी लिहून आणलेली आणि/किंवा पुरवणी उत्तरपत्रिका अवैधमार्गाने घेऊन जाणे/येणे. | स्वत:ची किंवा इतर परीक्षार्थ्याची लिहिलेली उत्तरपत्रिका आणि/किंवा पुरवणी उत्तरपत्रिका अनधिकृतपणे घेऊन येणे/जाणे तसेच परीक्षा केंद्रात अन्य ठिकाणी/ परीक्षा केंद्राव्यतिरिक्त अन्य ठिकाणी लिहून आणलेली आणि/किंवा पुरवणी उत्तरपत्रिका अवैध मार्गाने घेऊन जाणे/येणे. | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द .<br>२) पोलीसांत गुन्हा दाखल करणे. |

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (A) परीक्षापूर्व | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (B) परीक्षाकाळात | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (C) परीक्षोत्तर | शास्तीचा तपशील |
|---|---|---|---|---|
| २५ | ---------- | उत्तरपत्रिका/पुरवणी उत्तरपत्रिका किंवा त्याचा काही भाग (पूर्णत: किंवा अंशत:) परीक्षार्थ्याच्या स्वत:च्या हस्ताक्षरात लिहिलेला नसणे. | ---------- | परीक्षार्थ्याची त्या विषयाची संपादणूक रद्द. |
| २६ | ---------- | ---------- | परीक्षक, नियामक, मुख्य नियामक यांच्याकडे जाऊन अगर अन्यत्र संपर्क साधून उत्तरपत्रिकेत/ पुरवणी उत्तरपत्रिकेत बदल करणे/ उत्तरपत्रिकेत/ पुरवणी उत्तरपत्रिकेत स्वत: अगर अन्य व्यक्तीकडून जादा मजकूर लिहिणे/लिहून घेणे/पाने समाविष्ट करणे. | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द. २) संबंधित दोषी विरुध्द पोलीसांत गुन्हा दाखल करणे. |
| २७ | ---------- | ---------- | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेचे/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचे प्रमाणपत्र/ गुणपत्रिका प्रतिलिपी किंवा मंडळाद्वारे देण्यात येणाऱ्या इतर कोणत्याही दस्तऐवजात कोणत्याही वेळी अनधिकृतपणे बदल करणे. | १) संबंधित दोषी व्यक्तीविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल करणे. |
| २८ | ---------- | ---------- | परीक्षार्थ्यांचे कॉपीचे साहित्य उत्तरपत्रिकेमध्ये परीक्षकाकडे जाणे व ते परीक्षकाने उघडकीस आणणे. | परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रद्द करणे. |
| २९ | ---------- | परीक्षार्थ्याने दिलेल्या अधिकृत लेखनिकाच्या मदतीने अवैध मार्गांचा अवलंब करणे. | ---------- | १) परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रद्द करणे. |
| ३० | ---------- | ---------- | गैरप्रकाराच्या चौकशीसाठी अनेक वेळा बोलावूनही परीक्षार्थ्याने उपस्थित न राहणे/टाळाटाळ करणे/ जबाब देण्यास नकार देणे. | परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रद्द करणे. |
| ३१ | ---------- | ---------- | उत्तरपत्रिकेची छायाप्रत मंडळाकडून प्राप्त करून घेतल्यानंतर संबंधित उत्तरपत्रिकेची छायाप्रत प्रसार माध्यमांना देणे व मंडळाची बदनामी करणे. | परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रद्द करणे. |

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र: | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (A) परीक्षापूर्व | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (B) परीक्षाकाळात | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (C) परीक्षोत्तर | शास्तीचा तपशील |
|---|---|---|---|---|
| ३२ | ---------- | परीक्षार्थीने कोणत्याही प्रकाराने स्वतःची ओळख देणे.(उदा. विशिष्ट खुण करणे, चिन्ह काढणे, नांव पत्ता लिहिणे,मोबाईल/फोन क्रमांक , शाळेचे/केंद्राचे/ गावाचे नांव, बैठक क्रमांक, अथवा अन्य कोणत्याही प्रकारे ओळख पटविणारी बाब.) | ---------- | परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रद्द करणे. |

Scanned with OKEN Scanner

# प्रमाणपत्र

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा जून–जुलै २०२६

आमच्या शाळेतील/कनिष्ठ महाविद्यालयातील जून–जुलै २०२६ परीक्षेसाठी प्रविष्ठ होणा–या विद्यार्थ्यांच्या समोर गैरप्रकारासंबधी असलेल्या मंडळ शिक्षासूची व उत्तरपत्रिकेवरील विद्यार्थ्यांसाठीच्या सूचना यांचे सामूहिक वाचन/प्रत्येक विद्यार्थ्यास एक प्रत देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव–

शाळा /कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांक–

मुख्याध्यापक/प्राचार्य यांची स्वाक्षरी–

शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का–

Scanned with OKEN Scanner

# परीक्षार्थ्यांकरिता सूचना

१. परीक्षार्थ्यांनी प्रवेशपत्र आणि ओळखपत्र दररोज बरोबर आणावे. पर्यवेक्षक, केंद्रसंचालक व केंद्राला भेट देणारे अधिकारी ज्या ज्या वेळी प्रवेशपत्राची व ओळखपत्राची मागणी करतील त्या प्रत्येक वेळी त्यांना ते दाखविता आले पाहिजे.

२. परीक्षेच्या प्रत्येक पेपरच्या वेळी परीक्षा दालनात परीक्षार्थ्यांस पर्यवेक्षकाकडून बारकोड स्टिकर मिळाल्यानंतर विषय, बैठक क्रमांक याची खात्री करून उपस्थिती पत्रकावर (Attendance Sheet) बैठक क्रमांक, बारकोड स्टिकर क्रमांक लिहून स्वाक्षरी करावी आणि त्यानंतर बारकोड स्टिकर उत्तरपत्रिकेवर दिलेल्या जागेतच काळजीपूर्वक चिकटवावा.

३. उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावर तसेच पुरवणी उत्तरपत्रिकेवर ठरावीक रकान्यात बैठक क्रमांक अंकात व अक्षरात बिनचूक लिहून स्वाक्षरी करावी.

४. परीक्षार्थ्यांनी उत्तरपत्रिका मिळाल्यावर व पर्यवेक्षकाकडे जमा करताना ती मुद्रितांत असल्याची व त्यात सर्व पृष्ठे असल्याची खात्री करून घ्यावी.

५. उत्तरपत्रिकेच्या पृष्ठ क्रमांक ३ पासून लिहिण्यास प्रारंभ करावा.

६. उत्तरपत्रिकेच्या पानाच्या दोन्ही बाजूस समास सोडू नये. केवळ डाव्या बाजूसच समास सोडावा.

७. प्रत्येक पानाच्या दोन्ही बाजूस लिहावे. उत्तरपत्रिका किंवा पुरवणी उत्तरपत्रिकेचे कोणतेही पान फाडू नये. फाडल्यास परीक्षार्थी शिक्षासूचीनुसार शिक्षेस पात्र राहील.

८. पर्यवेक्षकाकडून घेतलेल्या उत्तरपत्रिकेवर व पुरवण्यांवर पर्यवेक्षकाची स्वाक्षरी असल्याची खात्री करून घ्यावी तसेच उत्तरपत्रिकेसोबत जोडलेल्या पुरवण्यांची मुख्य उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावर बिनचूक नोंदवावी.

९. प्रश्नपत्रिका मिळताच प्रश्नपत्रिकेच्या पहिल्या पृष्ठावर व त्यानंतरच्या प्रत्येक उजव्या पृष्ठावर स्वतःचा बैठक क्रमांक नोंदवावा.

१०. कच्चे लिखाण करावयाचे झाल्यास ते पेन्सिलनेच आणि मूळ उत्तरपत्रिकेच्या शेवटच्या पृष्ठावर करावे. त्या पृष्ठावर कच्चे लिखाण असा स्पष्ट उल्लेख असावा. प्रश्नपत्रिकेवर कच्चे लिखाण करण्यात येऊ नये.

११. संबंधित प्रश्नाचे अथवा उपप्रश्नाचे उत्तर जेथून सुरु होते तेथेच समासात प्रश्न क्रमांक, उपप्रश्न क्रमांक अचूक व स्पष्ट लिहावा. यासाठी वेगवेगळ्या शाईचा वापर करू नये.

१२. एकाच प्रश्नाच्या वेगवेगळ्या उपप्रश्नाकरिता वेगवेगळ्या पृष्ठे उपयोगात आणू नयेत.

१३. परीक्षार्थ्यांने उत्तराचा काही भाग खोडला असेल अथवा त्याला शाईत बदल करावा लागला असेल अथवा कोरा भाग सोडल्यामुळे त्याठिकाणी निळ्या/काळ्या शाईने रेघ मारली असेल अशा ठिकाणी पर्यवेक्षकाची स्वाक्षरी घेऊ नये.

१४. परीक्षार्थ्यांनी उत्तरपत्रिकेत निळ्या अथवा काळ्या शाईचाच वापर करावा अन्यथा मजकुरास गुणदान केले जाणार नाही.

१५. परीक्षार्थ्याविरुध्द खालीलपैकी कोणत्याही कारणास्तव नियमानुसार शिक्षेची कारवाई होऊ शकेल.

अ) पुस्तक, नोटस, मजकूर असलेला कागद परीक्षा दालनात आणणे, शरीरावर, कपड्यावर मजकूर लिहिलेला असणे.

ब) कोणत्याही परीक्षार्थ्याशी बोलणे / संपर्क साधणे / एकट्याने अथवा सामुदायिक कॉपिंग करणे.

क) प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका अथवा उत्तरपत्रिकेतील पाने किंवा पुरवणी परीक्षा कक्षातून बाहेर नेणे.

ड) उत्तरपत्रिका, पुरवणी उत्तरपत्रिका, प्रश्नपत्रिका आदींची अदलाबदल करणे, इतरांना देणे-घेणे.

इ) केंद्रसंचालक अथवा पर्यवेक्षकांकडून देण्यात आलेल्या सूचनांचे पालन न करणे अथवा अन्य गैरप्रकार करणे.

१६. उत्तरपत्रिकेत / पुरवणीत प्रक्षोभक / असांविधानिक भाषेचा वापर, शिवीगाळ लिहिणे किंवा धमक्या देणे, बैठक क्रमांक / फोन नंबर / भ्रमणध्वनी क्रमांक देऊन संपर्क साधण्याम सुचविणे / विनंती करणे याद्वारे स्वतःची ओळख देणे, विषयाशी संबंधित नसलेला अन्य मजकूर लिहिणे (चुकीची उत्तरे वगळून) तसेच कोणत्याही प्रकारने ओळख देणे (उदा., विशिष्ट खूण करणे, चिन्ह काढणे, नांव, पत्ता लिहिणे, शाळेचे / केंद्राचे / गावाचे नांव, अथवा अन्य कोणत्याही प्रकारे ओळख पटविणारी बाब.) इत्यादी कृती केल्यास अशा परीक्षार्थ्यांची चौकशी करून संबंधित विषयाची संपादणूक रद्द करण्यात येईल.

१७. परीक्षा सुरू झाल्यानंतर कोणत्याही परीक्षार्थ्यास परीक्षा संपेपर्यंत परीक्षागृहाबाहेर जाता येणार नाही. मात्र अपवादात्मक परिस्थितीत परीक्षागृहाबाहेर जावयाचे असल्यास परीक्षार्थ्याने प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका पर्यवेक्षकाकडे जमा करणे आवश्यक आहे.

१८. प्रत्येक पेपर संपण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर इशारा - घंटा होईल, त्यानंतर विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिका व पुरवण्यांवर काळ्या रंगाचा होलोक्राफ्ट स्टिकर प्रत्येकी एक या प्रमाणे दिलेल्या जागेवरच बरोबर चिकटवावा. प्रत्येक पेपरच्या शेवटी अंतिम घंटा होईल. अंतिम घंटा होताच उत्तर लिहिणे थांबवावे आणि मूळ उत्तरपत्रिका व पुरवण्या बरोबर असल्याची खात्री करावी. त्याचप्रमाणे मुखपृष्ठावर नमूद पुरवण्यांची नोंद करण्यात यावी आणि पर्यवेक्षकाने सर्व उत्तरपत्रिका गोळा करण्यापर्यंत परीक्षार्थ्यांनी आपले आसन सोडू नये.

१९. परीक्षार्थ्यांच्या प्रवेशपत्राचा / ओळखपत्राचा दुरुपयोग जो कोणी परीक्षा काळात करील त्याचे व संबंधित विद्यार्थ्यांचे वर्तन अजामीनपात्र व दखलपात्र गुन्हा आहे. दोन्ही संबंधितांविरुध्द नियमानुसार कारवाई केली जाईल.

२०. उत्तरपत्रिकेत स्केचपेनचा वापर करता येणार नाही. आकृत्यांसाठी निळ्या पेन्सिलचा वापर करावा. भाषा विषय कृतिपत्रिकामधील आकृत्यांसाठी पेनचा किंवा पेन्सिलचा वापर करावा.

२१. परीक्षार्थ्यांना परीक्षागृहात मोबाईल, इलेक्ट्रॉनिक घड्याळ, Pocket Calculator वा तत्सम इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांचा वापर करता येणार नाही.

## VERIFICATION/REVALUATION

| Q. No. | Original Marks | Marks after Verification | Marks after Revaluation |
|---|---|---|---|
| 1 | | | |
| 2 | | | |
| 3 | | | |
| 4 | | | |
| 5 | | | |
| 6 | | | |
| 7 | | | |
| 8 | | | |
| 9 | | | |
| 10 | | | |
| 11 | | | |
| 12 | | | |
| Total | | | |
| Appt. No. | | | |
| Signature | | | |
| (SIGNATURE & APPOINTMENT NO. OF REVALUATION COMMITTEE MEMBERS) | | | |



Scanned with OKEN Scanner

# परीक्षार्थ्यांकरिता सूचना

१. परीक्षार्थ्यांनी प्रवेशपत्र आणि ओळखपत्र दररोज बरोबर आणावे. पर्यवेक्षक, केंद्रसंचालक व केंद्राला भेट देणारे अधिकारी ज्या ज्या वेळी प्रवेशपत्राची व ओळखपत्राची मागणी करतील त्या प्रत्येक वेळी त्यांना ते दाखविता आले पाहिजे.

२. परीक्षेच्या प्रत्येक पेपरच्या वेळी परीक्षा दालनात परीक्षार्थीस पर्यवेक्षकाकडून बारकोड स्टिकर मिळाल्यानंतर विषय, बैठक क्रमांक याची खात्री करून उपस्थिती पत्रकावर (Form-1) बैठक क्रमांक, बारकोड स्टिकर क्रमांक लिहून स्वाक्षरी करावी आणि त्यानंतर बारकोड स्टिकर उत्तरपत्रिकेवर दिलेल्या जागेवरच काळजीपूर्वक चिकटवावा.

३. उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावर तसेच पुरवणी उत्तरपत्रिकेवर ठराविक ठिकाणी बैठक क्रमांक अंकात व अक्षरात विनचूक लिहून स्वाक्षरी करावी.

४. परीक्षार्थ्यांनी उत्तरपत्रिका मिळाल्यावर व पर्यवेक्षकाकडे जमा करताना ती मुद्रितशोधित असल्याची व त्यात सर्व पृष्ठे असल्याची खात्री करून घ्यावी.

५. उत्तरपत्रिकेच्या पृष्ठ क्र. ३ पासून लिहिण्यास प्रारंभ करावा.

६. उत्तरपत्रिकेच्या पानाच्या दोन्ही बाजूस समास सोडू नये. केवळ डाव्या बाजूस समास सोडावा.

७. प्रत्येक पानाच्या दोन्ही बाजूस लिहावे. उत्तरपत्रिका किंवा पुरवणी उत्तरपत्रिकेचे कोणतेही पान फाडू नये. फाडल्यास परीक्षार्थी शिक्षासूचीनुसार शिक्षेस पात्र राहील.

८. पर्यवेक्षकाकडून घेतलेल्या उत्तरपत्रिकेवर व पुरवण्यांवर पर्यवेक्षकाची स्वाक्षरी असल्याची खात्री करून घ्यावी तसेच उत्तरपत्रिकेसोबत जोडलेल्या पुरवण्यांची संख्या उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावर विनचूक नोंदवावी.

९. प्रश्नपत्रिका मिळताच प्रश्नपत्रिकेच्या पहिल्या पृष्ठावर व त्यानंतरच्या प्रत्येक उजव्या पृष्ठावर स्वत:चा बैठक क्रमांक नोंदवावा.

१०. कच्चे लिखाण करावयाचे झाल्यास ते पेन्सिलनेच आणि मूळ उत्तरपत्रिकेच्या मधल्या पृष्ठावर करावे. त्या पृष्ठावर कच्चे लिखाण असा स्पष्ट उल्लेख असावा. प्रश्नपत्रिकेवर कच्चे लिखाण करण्यात येऊ नये.

११. संबंधित सेक्शन/प्रश्न/उपप्रश्नाचे उत्तर जेथून सुरू होते तेथेच समासात सेक्शन/प्रश्न/उपप्रश्न क्रमांक अचूक व स्पष्ट लिहावा. यासाठी वेगवेगळ्या शाईचा वापर करू नये.

१२. एकाच सेक्शनच्या/प्रश्नाच्या वेगवेगळ्या प्रश्न/उपप्रश्नाकरिता वेगवेगळी पृष्ठे उपयोगात आणू नयेत.

१३. परीक्षार्थ्याने उत्तराचा काही भाग खोडला असेल अथवा त्याला शाईत बदल करावा लागला असेल अथवा कोरा भाग सोडल्यामुळे त्याठिकाणी निळ्या/काळ्या शाईने रेघ मारली असेल अशा ठिकाणी पर्यवेक्षकाची स्वाक्षरी घेऊ नये.

१४. परीक्षार्थ्यांनी उत्तरपत्रिकेवर निळ्या अथवा काळ्या शाईचाच वापर करावा. अन्यथा मजकुरास गुणदान केले जाणार नाही.

१५. परीक्षार्थ्याविरुध्द खालीलपैकी कोणत्याही कारणास्तव नियमानुसार शिक्षेची कारवाई होऊ शकेल.

अ) पुस्तक, नोट्स, मजकूर असलेला कागद परीक्षा दालनात आणणे, शरीरावर, कपड्यावर मजकूर लिहिलेला असणे.

ब) कोणत्याही परीक्षार्थ्याशी बोलणे / संपर्क साधणे / एकट्याने अथवा सामुदायिक कॉपिंग करणे.

क) प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका अथवा उत्तरपत्रिकेतील पाने किंवा पुरवणी परीक्षा कक्षातून बाहेर नेणे.

ड) उत्तरपत्रिका, पुरवणी उत्तरपत्रिका, प्रश्नपत्रिका आदींची अदलाबदल करणे, इतरांना देणे-घेणे.

इ) केंद्रसंचालक अथवा पर्यवेक्षकांकडून देण्यात आलेल्या सूचनांचे पालन न करणे अथवा अन्य गैरप्रकार करणे.

१६. उत्तरपत्रिकेत / पुरवणीत प्रक्षोभक / असांविधानिक भाषेचा वापर, शिवीगाळ लिहिणे किंवा धमक्या देणे, बैठक क्रमांक / फोन नंबर / भ्रमणध्वनी क्रमांक देऊन संपर्क साधण्यास सुचविणे / विनंती करणे याद्वारे स्वत:ची ओळख देणे, विषयाशी संबंधित नसलेला अन्य मजकूर लिहिणे (चुकीची उत्तरे वगळून) तसेच कोणत्याही प्रकाराने ओळख देणे (उदा., विशिष्ट खूण करणे, चिन्ह काढणे, नांव, पत्ता लिहिणे, शाळेचे / केंद्राचे / गावाचे नांव, अथवा अन्य कोणत्याही प्रकारे ओळख पटविणारी बाब.) इत्यादी कृती केल्याचे अशा परीक्षार्थ्यांची चौकशी करून संबंधित विषयाची संपादणूक रद्द करण्यात येईल.

१७. परीक्षा सुरू झाल्यानंतर कोणत्याही परीक्षार्थ्यास परीक्षा संपेपर्यंत परीक्षागृहाबाहेर जाता येणार नाही. मात्र अपवादात्मक परिस्थितीत परीक्षागृहाबाहेर जाण्यास परीक्षार्थ्याने प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका पर्यवेक्षकाकडे जमा करणे आवश्यक आहे.

१८. प्रत्येक पेपर सकाळची १० मिनिट अगोदर दुसरा - घंटा होईल. त्यानंतर विद्यार्थ्यांने उत्तरपत्रिका व पुरवण्यांचा काळजीपूर्वक तपासून घेतलेक्रमांक स्वत: प्रत्येकी एक या प्रमाणे दिलेल्या जागेवरच व्यवस्थित चिकटवावा. प्रत्येक पेपरची शेवटची अंतिम घंटा होईल. अंतिम घंटा होताच उत्तरे लिहिण्याचे थांबवावे आणि मूळ उत्तरपत्रिका व पुरवण्या यांचा क्रमांक खात्री करावी. त्याप्रमाणे मुखपृष्ठावर एकूण पुरवण्यांची नोंद करण्यात यावी आणि पर्यवेक्षकाने या उत्तरपत्रिका गोळा करण्यापूर्वी परीक्षार्थ्यांनी आपले आसन सोडू नये.

१९. परीक्षार्थ्यांच्या प्रवेशपत्राचा / ओळखपत्राचा दुरुपयोग जो कोणी परीक्षा काळात करील त्याचे व संबंधित विद्यार्थ्याचे उत्तर अप्रमाणित दाखलपात्र गुन्हा आहे. दोन्ही संबंधितांविरुध्द नियमानुसार कारवाई केली जाईल.

२०. उत्तरपत्रिकेत स्केचपेनचा वापर करता येणार नाही. आकृत्यांसाठी साध्या पेन्सिलचा वापर करावा. भाषा विषय कृतिपत्रिकामध्ये आकृत्यांसाठी पेन अथवा पेन्सिलचा वापर करावा.

२१. परीक्षार्थ्यांना परीक्षागृहात मोबाईल, इलेक्ट्रॉनिक घड्याळ, Pocket Calculator वा तत्सम इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांचा वापर करता येणार नाही.

२२. मंडळाने दिलेले अधिकृत लॉग टेबल वापरावे व पेपर संपल्यानंतर ते जमा करावे.

## VERIFICATION / REVALUATION

| Sec./ Q.No. | Original Marks | Marks after Verification | Marks after Revaluation |
|---|---|---|---|
| A/1 | | | |
| B/2 | | | |
| C/3 | | | |
| D/4 | | | |
| 5 | | | |
| 6 | | | |
| 7 | | | |
| 8 | | | |
| 9 | | | |
| 10 | | | |
| 11 | | | |
| 12 | | | |
| Total | | | |
| Appt. No. | | | |
| Signature | | | |

(SIGNATURE & APPOINTMENT NO. OF REVALUATION COMMITTEE MEMBERS)

CANCELLED



Scanned with OKEN Scanner